


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २७०, शनिवार १३ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# लंके प्रतिष्ठाणकडून तहसिल कार्यालयातील अनागोंदीचा पर्दाफाश !

## ■ तहसिल कार्यालयासमोर ठिय्या देताच प्रशासन सुतासारखे सरळ ■ २४० रेशनकार्डचे वितरण ■ शासन आपल्या दारी योजनेचा बोजवारा उडाल्याचेही उघड

पारनेर : विशेष प्रतिनिधी

**नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या कार्यकर्त्यांनी तहसिल कार्यालयाच्या अनागोंदी कारभाराचा शुक्रवारी पर्दाफाश केला. आश्वासन नको तर लगेच प्रलंबित कामे मार्गी लावा, त्याशिवाय आम्ही येथून उठणार नाही अशी संघर्षाची भूमिका घेण्यात आल्यानंतर महसूल प्रशासन सुतासारखे सरळ झाले. दोन-ते तीन वर्षापासून रखडलेली रेशनकार्डची प्रकरणे निकाली काढण्याचे काम हाती घेण्यात येऊन तब्बल २४० रेशनकार्ड नागरिकांकडे सुपूर्दही करण्यात आली. दरम्यान, कोटयावधी रूपये खर्चून राबविण्यात आलेला शासन आपल्या दारी या कार्यक्रमाचा बोजवारा उडाल्याचेही यावेळी उघड झाले. त्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नांवर तहसिलदार गायत्री सैंदाणे या निरूत्तर झाल्या.**

यावेळी बोलताना राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या आयटी सेलचे प्रदेशाध्यक्ष जितेश सरडे यांनी सांगितले की, ऑनलाईन नोंदणी, नवीन प्रकरणे, नाव कमी करणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दाखले, रस्ता प्रकरणे आदींबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तीन दिवसांपूर्वी नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने महसूल प्रशासनाकडे निवेदन सादर करण्यात आले होते. या निवेदनानुसार तालुक्यातील नागरीकांसह आंदोलन करण्यात आले. तहसिलदार गायत्री सैंदाणे यांनी सायंकाळपर्यंत जास्तीत जास्त रेशनकार्ड देण्याची ग्वाही दिली आहे. ऑनलाईन नोंदणीसंदर्भात लिंकमध्ये गेल्या वर्षभरापासून अनेक अडचणी निर्माण झाल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. परंतू येत्या १५ दिवसांत ऑनलाईन नोंदी महसूल विभागाचे कर्मचारी रात्रीही बसवून पुर्ण करण्याचे अश्वासन देण्यात आले असल्याचे सरडे म्हणाले.

आंदोलनामध्ये नीलेश लंके प्रतिष्ठाणचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब खिलारी, मा. सरपंच रविंद्र राजदेव, जितेश सरडे, भाऊ चौरे, अप्पासाहेब शिंदे, सचिन पठारे, चंद्रभान ठुबे, दत्ता दिवटे, भाउसाहेब भोगाडे, सन्वर शेख, अमित जाधव, गणेश मापारी, बापू ठुबे, पोपट गुंड, ॲड. गणेश कावरे, दत्ता ठाणगे, दौलत गांगड, बाळा करंजुले, उमाताई बोरूडे, मिराबाई गोरडे, लखन ठाणगे, शशी कारखिले, बाजीराव कारखिले यांच्यासह तालुक्यातील नागरीक यावेळी उपस्थित होते.



■ तहसिल कार्यालयातील विविध प्रलंबित प्रश्नांसाठी नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले.

### शासन आपल्या दारी योजनेचा फज्जा

शासन आपल्या दारी या योजनेसाठी कोटयावधी रूपये खर्च करण्यात आले. या योजनेतून किती लोकांची प्रकरणे मार्गी लागली. त्याची यादी सादर करण्याची मागणी जितेश सरडे यांनी यावेळी तहसिलदार गायत्री सैंदाणे यांच्याकडे केली. शासन लोकांच्या दारी जाऊनही फायदा होत नाही तर लोक तुमच्या दारी आल्यानंतर काय फायदा होणार असा सवालही सरडे यांनी यावेळी उपस्थित केला. शासन आपल्या दारी कार्यक्रमात लोकांकडून कागदपत्रे संकलीत करून घेण्यात आली. त्याचा लोकांना फायदाच झाला नाही मग अशा कार्यक्रमांचा उपयोग काय असा सवालही सरडे यांनी केला. दरम्यान, शासन आपल्या दारी योजनेच्या लाभार्थ्यांची यादी तहसिलदार गायत्री सैंदाणे देऊ शकल्या नाहीत.

### अपंग नागरीकास तात्काळ रेशनकार्ड

पारनेर येथील अपंग व्यक्ती गेल्या आठ महिन्यांपासून रेशकार्डसाठी हेलपाटे मारत आहे. त्यासंदर्भात तहसिलदार सैंदाणे यांच्याकडे विचारणा करण्यात आल्यानंतर १५ मिनिटात त्या अपंग व्यक्तीस रेशनकार्ड देण्यात आले. वृध्द, अपंग, विद्यार्थी यांच्या समस्या प्रामुख्याने आहेत. त्या तातडीने मार्गी लागल्या पाहिजेत.

जितेश सरडे
प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस आयटी सेल

### वीस दिवसांत पासपोर्ट, नाव कमी करण्यासाठी दोन वर्षे !

परदेशी जाण्यासाठी आवश्यक असलेला पासपोर्ट वीस दिवसांत घरपोच येतो. पारनेरच्या तहसिल कार्यालयात रेशनकार्डवरील नाव कमी करण्यासाठी दोन-दोन वर्षे लागत असल्याची उपहासात्मक टीका जितेश सरडे यांनी यावेळी केली.

### तोडगा निघाल्याशिवाय माघार नाही

दोन, तीन वर्षांपासून रेशनकार्डच्या समस्या आहेत. आम्ही आंदोलन सुरू केले असून तोडगा निघाल्याशिवाय येथून उठणार नाही. तहसिलदारांचे लेखी अश्वासनही नको. लगेच कामे मार्गी लावा. गोड बोलून काही उपयोग होणार नाही.

रविंद्र राजदेव
मा. सरपंच, नांदूरपठार

### सन २०१८ पासून प्रकरणे प्रलंबित

पळशी येथील प्रलंबित रेशनकार्डचा प्रश्न दिड वर्षांपासूनचा आहे. विशेष कॅम्पचे आयोजन करून ही रेशनकार्ड देण्यात आली होती. मात्र पुरवठा विभागात या रेशनकार्डची कागदपत्रे सापडत नाहीत. या रेशनकार्डधारकांची दोनदा कागदपत्रे सादर करूनही आता पुन्हा कागदपत्रे सापडत नसल्याचे सांगितले जात आहे. २०१८ मध्ये कॅम्पमध्ये २०० रेशनकार्ड वितरीत करण्यात आले होते. अद्यापही हे रेशनकार्ड ऑनलाईन झाले नाहीत. हे रेशनकार्ड ऑनलाईन करण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही तहसिलदार गायत्री सैंदाणे यांनी यावेळी दिली. आदिवासी बांधवांना रेशनवर धान्य मिळत नाही या लोकांनी काय करावे असा सवाल माजी सरपंच अप्पासाहेब शिंदे यांनी केला.

### सामान्य माणसाची काय पर्वा ?

पळशी येथील १५० आदिवासी बांधवांची प्रकरणे दिड वर्षापूर्वी दिली. त्यांचे उत्पन्नाचे दाखले तिनदा दिले. वेळोवेळी यादी मागितली जाते. नंतर चौकशी केली असता यादी गहाळ झाल्याचे सांगितले जाते. जनता दरबारात आलेली प्रकरणेही व्यवस्थीत हाताळली जात नाहीत. संजय गांधी विभागात दोन वर्षापासून आम्ही हेलपाटे मारतो आहोत. प्रकरणे मार्गी लावण्यास टाळाटाळ केली जाते. आम्हाला ही वागणूक मिळत असेल तर सर्वसामान्यांची काय पर्वा ?

जितेश सरडे, अप्पासाहेब शिंदे, सचिन पठारे, रविंद्र राजदेव
नीलेश लंके प्रतिष्ठाण

### १५ दिवसांत ऑनलाईन रेशनकार्डची प्रकरणे मार्गी लावू

डिसेंबर २०२३ मध्ये शासनाने ऑफलाईन रेशनकार्ड बंद केले आहे. ही योजना तालुक्यात राबविणे शक्य नसल्याने ऑफलाईन रेशनकार्ड सुरू होते. लाडकी बहिण योजना आल्यानंतर नागरीकांची गर्दी वाढल्याने पुन्हा ऑफलाईन रेशकार्ड पुन्हा सुरु करण्यात आले आहेत. शासनाकडून आता केशरी रेशनकार्ड प्रिंटींग बंद करण्यात आले आहे.यापुढील काळात दाखल्याप्रमाणे रेशनकार्ड मिळणार आहे. १५ ते २० दिवसांत ऑनलाईन रेशनकार्डची प्रकरणे निकाली काढण्यात येतील.

गायत्री सैंदाणे
तहसिलदार

### दिड महिन्यात दाखला मागण्यचा मला अधिकार !

एकदा उत्पन्नाचा दाखला दिल्यानंतर दिड महिन्यानंतर पुन्हा तोच दाखला मागितला जातो. तहलिदारांच्या थम्बने दाखला दिलेला असताना तहसिलदार पुन्हा या दाखल्याची मागणी का करतात असा प्रश्न सचिन पठारे यांनी उपस्थित केल्यानंतर दाखला मागण्याचा मला अधिकार असल्याचे अजब उत्तर तहसिलदार गायत्री सैंदाणे यांनी दिले. तसा शासन आदेश असल्याचेही त्यांनी सांगितले.

### ही वेळ का आली ?

महसूल विभागाचे कर्मचारी तहसिलदारांपेक्षाही आम्ही वरिष्ठ आहोत असे वागतात. पुरवठा विभागाबरोबरच संजय गांधी निराधार योजनेच्या कार्यालयातील कर्मचारीही मनमानी पध्दतीने वागतात. आज आंदोलनात प्रत्येक नागरीक गाऱ्हाणे मांडतो आहे ही वेळा का आली ? ज्यावेळी तुमच्याकडे प्रत्येक व्यक्ती येत होती, त्यावेळी त्यास कशी वागणूक मिळत होती ? तीन वर्षांपासून लोक हेलपाटे मारत आहेत, ऑनलाईन बेवबसाईट का सुरू झाली नाही ?

जितेश सरडे
प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस आयटी सेल

---

## नगर जिल्ह्यात माझी लाडकी बहीण योजनेची विशेष मोहीम

### ग्रामीण भागात योजनेचा प्रचार

नगर : प्रतिनिधी

**नगर जिल्ह्यात महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्य आणि आरोग्य सुधारण्यासाठी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेची दोन दिवसीय विशेष मोहीम आयोजित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ या मोहिमेच्या आयोजनाच्या सूचना दिल्या आहेत.**

ही मोहीम १२ व १३ जुलै रोजी आयोजित केली जाईल. या मोहिमेत महिलांना ऑनलाइन आणि ऑफलाइन अर्ज भरण्याची संधी दिली जाईल. ग्रामीण भागात योजनेचा प्रचार केला जाईल. शिबिरस्थळी पिण्याचे पाणी,



प्राथमिक आरोग्य सेवा आणि इंटरनेट सुविधा उपलब्ध असतील. विशेष मोहिमेत सहभागी होण्यासाठी ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, मदतनीस आदी कर्मचाऱ्यांची पथके तयार केली जातील. योजनेचा लाभ अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मोहिमेचा अहवाल १५ जुलै रोजी सादर करायचा आहे.







# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या


## कुलर वापरताहेत? ही घ्या काळजी!

सध्या वाढत्या उन्हामुळे गरमी खूप होत आहे. लोक फॅनपेक्षा कुलर आणि एसीला अधिक पसंत देत आहेत. यामुळे आरामदायी वाटत असले तरी सुरक्षित वापर न केल्याने विपरितही घडत आहे. कुलरमध्ये पाणी भरून त्याचा वापर करावा लागतो, हे तुम्हाला माहितीच आहे. पाणी भरतानाही काळजी घेणे खूप आवश्यक आहे. नाहीतर, याचे घातक परिणाम तुम्हाला भोगावे लागू शकतात. कुलरचा वापर थ्री पीन प्लगवरच करावा. घरात अर्थ लिकेज सर्किट ब्रेकर्स बसवून घ्यावेत. अर्थिंग योग्य असल्याची तपासणी सातत्याने करावी. कुलरमध्ये पाणी भरतेवेळी आधी कूलरचा वीज प्रवाह बंद करून प्लग काढावा आणि मगच त्यात पाणी भरावे. कुलर लाकडी स्टॅण्डवर ठेवावा. कुलरच्या आतील वीज तार पाण्यात बुडाली नसल्याची खात्री करून घ्यावी. कुलरमधील पाणी खाली जमिनीवर सांडणार नाही याची काळजी घ्या. ओल्या हाताने कुलरला स्पर्श करणे टाळा. कुलरची वायर सदैव तपासून बघा. फायबर बाह्यभाग असलेल्या व चांगल्या प्रतीच्या कुलरचा वापर प्राधान्याने करावा.



## फेसबुक वापरताना महिलांनी काय काळजी घ्यावी?

**आजकाल बऱ्याच महिला, मुली फेसबुकवर ॲक्टिव असतात. दैनंदिन स्टेटस अपडेट करण्यापासून तर सतत छायाचित्रे शेअर करताना त्या दिसतात. मित्र–मैत्रिणींशी संवादही फेसबुकच्या माध्यमातून साधला जात आहे. मात्र फेसबुकमुळे त्या जितक्या सोशल झाल्या आहेत आणि त्याचे फायदे त्यांना जाणवत आहेत, तितकेच तोटेही त्यांना अनुभवायला लागू शकतात. त्यामुळे फेसबुक वापरताना त्यांनी कोणती काळजी घ्यावी, याच्या टिप्स देत आहोत...**




- फोन नंबर काढा : फेसबुक अकाऊंटवर तुमचा फोन नंबर असेल तर तो लगेच काढून टाका. कारण या नंबरचा गैरवापर होऊ शकतो. एखाद्याला तुमच्याशी संपर्क साधायचा असेल तर तो मॅसेंजरची मदत घेऊ शकतो. यापूर्वी फेसबुक रजिस्ट्रेशनसाठी फोन नंबर मागितला जायचा, आता त्याची गरज नाही.
- जन्मतारिख काढा : फेसबुकवर जन्मतारीख ठेवण्याची गरज नाही. तुमच्या जन्मतारखेचा वापर करून हॅकर्स अनेक प्रकारची माहिती मिळवू शकतात. त्यामुळं जन्मतारीख काढून टाका.
- ठावठिकाणा सांगू नका : पिकनिकसाठी वा कार्यालयीन कामासाठी घराबाहेर जाताना त्याबद्दलची माहिती मित्रांना देण्याचा मोह आपल्याला टाळता येत नाही. या मोहापायी आपण कुठं जात आहोत, किती दिवसासाठी जाणार आहोत, काय करणार आहोत, ही माहिती फेसबुकवर सहज टाकतो. हे टाळा. कारण यामुळं तुम्ही कुठं जाणार आहात हे सर्वांना कळतं. त्याचा गैरफायदा घेतला जाऊ शकतो. विमानतळ तसंच, सुट्टीच्या ठिकाणांचे फोटो टाकण्याचं टाळा. विशेषत: घराबाहेर असल्याची माहिती देणं टाळा. अन्यथा, तुमच्या गैरहजेरीत तुमच्या घरी चोरी होण्याचा धोका असतो.
- पार्टी फोटोज नकोत : अनेकदा आपण पबमधील किंवा एखाद्या पार्टीत मद्यपान केल्याचे फोटो फेसबुकवर टाकतो. प्रायव्हसी सेटिंग हॅक करून एखादी व्यक्ती हे खासगी फोटो शेअर करू शकते. हे फोटो तुमच्या कुटुंबीयांनी पाहिल्यास कौटुंबिक कलह निर्माण होऊ शकतो. शिवाय, कंपन्या सध्या नोकरी देण्याआधी उमेदवाराचं सोशल अकाउंट तपासतात. त्यामुळं असे फोटो अपलोड करणं टाळा.
- बॉसला अनफ्रेंड करा : बॉसला फ्रेंडलिस्टमध्ये ठेवू नका. कारण, तुम्ही मांडलेल्या परखड मतांमुळं वा वैयक्तिक विचारांमुळं तो नाराज होऊ शकतो. त्यामुळं तुमची नोकरीही जाऊ शकते. अशी अनेक उदाहरणं आहेत. त्यामुळं फेसबुकच्या बाबतीत बॉसपासून सुरक्षित अंतर ठेवणं कधीही चांगलं.



- रिलेशनशिपची काळजी घ्या : माजी प्रियकराचा (अर्थात असल्यास) फोटो फेसबुकवरून हटविणं कधीही चांगलं. या फोटोंमुळं तुमच्या भावी जीवनात वादळं येऊ शकतात. विशेषत: ॲरेंज मॅरेजच्या वेळी अडचणी निर्माण होऊ शकतात.
- वादग्रस्त पोस्टवर प्रतिक्रिया नकोत : ज्या कोणत्या पोस्टस तुम्हाला आक्षेपार्ह, वादग्रस्त, कलह वाढवणाऱ्या अथवा अश्लील वाटतील, अशा पोस्टच्या वाटेला जाऊ नका. अशा पोस्ट लाईक–शेअर करु नका. त्यावर कसलीही प्रतिक्रिया देणे टाळा.

## इन्स्टा क्लिक!





**काही वर्षांपूर्वी फेसबुकने यूथच्या मनावर गारुड केलं. फॅन्सशी संवाद साधण्यासाठी सेलिब्रिटीजनीही फेसबुकला आपलंसं केलं. एफबीनंतर एक एक करून सगळे सेलिब्रिटीज ट्विटरवर आले. त्यापाठोपाठ इन्स्टाग्रामही सेलिब्जज मध्ये लोकप्रिय होताना दिसतेय. इन्स्टावर आपले फोटोज शेअर करत फॅन्सशी ते संवाद साधताहेत.**

### फोटोग्राफीला वाव मिळतो : सुयश टिळक



मला इन्स्टाग्राम जरा जास्तच आवडतं. या फोटो शेअरिंग सोशल नेटवर्किंग साईटसोबत मी स्वत:ला कनेक्ट करतो. कारण मला मुळातच फोटोग्राफीची आवड आहे. सर्वच ठिकाणी कॅमेरा सोबत नेणं शक्य होत नाही. अशावेळी आपल्या जवळ असलेल्या फोनमधून फोटो काढून ते आपल्या फॅन्सपर्यंत पोहोचवण्यात मला आनंद मिळतो. त्यातही मला त्यातला एक्सप्लोर हा ऑप्शनदेखील फार भारी वाटतो. कारण एका क्लिकमध्ये तुम्ही तुमच्या आजूबाजूच्या जगातले, तुमचे इन्स्टाग्रामवरचे मित्र ज्याला कोणाला फॉलो करत असतील त्या सर्वांचे फोटोज पाहू शकता.

### जास्त ॲक्टिव्ह : मानसी नाईक



इन्स्टाग्राम हे माझ्या मते अगदी त्याच्या नावा प्रमाणे इन्स्टा आहे. अगदी लगेचच तुम्हाला हवा तो फोटो इथे अपलोड करू शकता. आणि मी तर फेसबुकवर जराही ॲक्टिव्ह नाही, ट्वीटरवर त्यामानाने बरीच ॲक्टिव्ह आहे. पण इन्स्टाग्रामवर मी जास्त ॲक्टिव्ह आहे. मी माझं मीपण जपत स्वत:चे भरपूर फोटो इन्स्टाग्रामवर टाकत असते. माझे सेल्फी जास्त असतात. माझ्या रोजच्या आयुष्यातल्या कितीतरी गोष्टी तुम्हाला माझ्या इन्स्टाग्रामच्या पेजवर पाहायला मिळतील. त्या फोटोंवर लाईक करून किंवा कमेंट करून माझे फॅन्स माझ्याशी त्या पेजवर संवाद साधतात.

### न चुकता फोटो टाकतो : अभिजित खांडकेकर

जेव्हा मला माझ्या फ्रेंड्सकडून इन्स्टाग्रामबद्दल समजलं त्यानंतर मी लगेचच यावर जॉइन झालो.



मला या साईटवरचं सगळ्यात जास्त आवडतं ते म्हणजे ही संपूर्ण फोटोग्राफी बेस असलेली साइट आहे. मला मुळात फोटोग्राफीची आवड आहे. लोकांना माहित नसलेली माझ्या व्यक्तिमत्त्वातली बाजू मी या साइटच्या मदतीने लोकांपर्यंत पोहोचवू शकतो. मी न चुकता रोजच्या रोज या साइटवर फोटो टाकत असतो. यात अजून एक आकर्षक गोष्ट म्हणजे तुम्ही हॅशटॅग वापरत तुमचं लोकेशन संपूर्ण जगासमोर ठेऊ शकता.

### फिल्म प्रमोशनसाठी फायदा – श्रुती मराठे



इन्स्टाग्रामवरची सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे इथे तुम्हाला स्टेटस अपडेट वगैरे करण्याची गरज भासत नाही. इथे तुमच्या मनातलं बोलण्याचं काम हे तुमचे फोटोच करतात आणि मला सर्वात जास्त हेच भावतं. दुसरं म्हणजे यात इनबिल्ट एडिटिंग असतं. मग फक्त फोटो काढा, स्वत:च त्यात इफेक्ट टाकत एडिट करा, त्याला तुमच्या पसंतीने सुंदर बनवा आणि लोकांसोबत शेअर करा. माझ्या मते आपल्या नाटकाच्या अथवा सिनेमाच्या प्रमोशन्ससाठीदेखील हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो. मी माझ्या सिनेमाच्या मुहूर्तापासून ते त्याच्या प्रमोशनल दौऱ्यांपर्यंतचे फोटो इथे टाकत असते.

### एफबी ट्विटरपेक्षा उजवं – सिद्धार्थ चांदेकर



मला इन्स्टाग्राम अतिशय आवडतं. इन्स्टाग्राम हा एक चांगला आणि वेगळा पर्याय आहे असं मला वाटतं. म्हणजे फेसबुकवर कितीही लिहायची मुभा असल्याने किती लिहू आणि काय काय लिहू असं होतं. ट्वीटरवर फक्त १४० शब्दांत लिहायचं म्हणजे जरा अवघड होऊन बसतं. पण इथे फोटो शेअर करायचा असतो. म्हणजे आपल्याला काहीच लिहायची गरज नाही. आपल्या मनात जे काही येतंय त्यासाठी फोटो बोलतो आणि ते मला फार जास्त आवडतं. जर इन्स्टाग्राम क्रिएटीव्हपणे वापरलं तर फिल्म प्रमोशनसाठीसुद्धा ह्याचा उत्तम उपयोग होऊ शकतो.

## कॅम स्कॅनरमध्ये व्हायरस?

**कॅम स्कॅनरमध्ये व्हायरस असून तो तुमचा डेटा चोरी करू शकतो, अशा आशयाच्या बातम्या काही दिवसांपूर्वी पसरल्या आणि काही युजर्सनी या ॲपला राम राम ठोकला. हे प्रकरण इथेच न थांबता गुगल प्ले स्टोअर वरून हे ॲप मागे घेतलं गेलं. एव्हाना सर्वांना या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात आलं आणि एरवी तसा हलक्यात घेण्यात येणारा हा मुद्दा लोकांसमोर समस्या बनून आला, तो म्हणजे जाहिराती!**





एखाद्या कागदपत्राची सॉफ्टकॉपी किंवा पीडीएफ तयार करण्याची गरज या ना त्या कारणाने बहुतांश जणांना भासते. ही सुविधा पुरवणारी शेकडो अँड्रॉइड ॲप्लिकेशन्स आज गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहेत. यातील सर्वाधिक लोकप्रिय ॲप म्हणजे कॅम स्कॅनर. कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांपासून ते अगदी कॉलेज विद्यार्थ्यांपर्यंत प्रत्येक जण आपल्या स्मार्टफोनमध्ये कॅम स्कॅनर बाळगून होता. मात्र कॅम स्कॅनरमध्ये व्हायरस असल्याच्या बातमीचं लोण पसरलं आणि सर्वांनी ते ॲप तातडीनं काढून टाकलं. प्रकरणाच्या अधिक खोलात गेल्यावर, कॅम स्कॅनरमधील या व्हायरसचा उगम, त्या ॲपमधील ॲडव्हर्टाइझमेंट सॉफ्टवेअर डेव्हल्पमेंट कीट अर्थात ॲड एसडीके मध्ये असल्याचं उघड झालं. कॅम स्कॅनरसारखी मोफत सेवा देणाऱ्या ॲप्सचं मुख्य उत्पन्न जाहिराती असतात. या जाहिराती ॲपच्या कोडमध्ये नसून, ॲड एसडीकेमध्ये असतात. ॲड एसडीके हा तुमच्या ॲप आणि जाहिरातींमधील दुवा असतो. अर्थात अधिकाधिक उत्पन्न मिळवण्यासाठी अधिकाधिक जाहिराती मिळवण्याची चढाओढ असते. याच नादात कॅम स्कॅनरला ॲड हब नावाच्या कंपनीने काही ॲड एसडीके प्रदान केले आणि तिथंच सगळं फिस्कटलं. त्या ॲड एसडीकेमध्ये ट्रोजन डाऊनलोडर होता जो अवैधरित्या तुमच्या फोनमध्ये शिरून काही फाइल्स डाऊनलोड करायला सुरुवात करतो. यावर नियंत्रण मिळवणं सामान्य युजर्सना शक्य नसतं. काही युजर्सना या घटनेनंतर विचित्र अनुभव आले. विचित्र जाहिराती, असंबद्ध गोष्टींसाठीची सबस्क्रिप्शन्स या सगळ्याला वैतागून युजर्सनी प्लेस्टोअर रिव्ह्यू सेक्शनमध्ये आपल्या रागाला वाट मोकळी करून दिली. या ॲपचं रेटिंग इतक्या झपाट्याने खाली आलेलं पाहून कंपनीने प्रकरणाची अंतर्गत छाननी केली आणि झालेला प्रकार उघडकीस आला. परिणामी, कॅम स्कॅनर प्ले स्टोअरवरून काही काळासाठी काढावं लागलं.

### काय खबरदारी घ्याल?

- जर तुमच्या फोनमध्ये अचानक अशा जाहिराती वारंवार येऊ लागल्या तर तुमचा फोन सेफ मोडमध्ये रिस्टार्ट करा आणि तुम्ही जी ॲप्स नुकतीच इन्स्टॉल केली आहेत, ती तातडीने काढून टाका. नंतर नॉर्मल मोडमध्ये रिस्टार्ट करा. तुमचा फोन सेफ मोडमध्ये कसा चालू करायचा याची माहिती तुम्हाला इंटरनेटवर सहज मिळू शकेल.
- गुगल प्ले स्टोअरच्या मेन्यूमधील प्ले प्रोटेक्टवर जाऊन वारंवार आपल्या ॲप्सच्या सुरक्षिततेची खात्री करून घ्या.
- जर तुम्ही ॲप्स डेव्हलपर असाल तर गुगलने नुकत्याच बंदी घातलेल्या ॲड एसडीकेच्या नावांची यादी पडताळून पाहा.



## ती मोबाईलवर नक्की करते काय?

**सतत मोबाइलमध्ये डोकं खुपसून बसलेल्या तमाम महिलावर्गाबद्दल पुरुषांना भलतीच उत्सुकता असते. या बायका मोबाइलवर नेमकं करतात तरी काय? असा प्रश्न अनेकांना असतो. स्मार्टफोनचा उपयोग खरंच स्मार्टपणे होतो की नुसतंच टीपी आणि गप्पा–टप्पांसाठी त्याचा वापर होतो, यावर बोलत्या झालेल्या काही तरुणी...**




### व्यवसायासाठी वापरते

माझा फोन कोणता महागडा ब्रँडेड स्मार्टफोन नाही. पण त्याचा स्मार्टली वापर कसा करायचा, हे मात्र मी जरूर पाहते. मी एक ब्लॉगर आणि कंटेट रायटर आहे. त्याशिवाय अनेक छोट्या उद्योजकांना त्यांच्या उद्योगाकरिता ब्लॉगिंग आणि सोशल मीडियावर मार्केटिंगसाठी मी मदत करत असते. माझा हा व्यवसाय मी संपूर्णतः माझ्या स्मार्टफोनच्या माध्यमातूनच चालवते. फोन, एसएमएस ही तर नेहमीच्या पठडीतले संपर्काची माध्यमं झाली पण त्याव्यतिरिक्त व्हॉट्स ॲप, हाईक, ईमेल अशी ॲप्स वापरून ग्राहकांच्या संपर्कात राहणं सोपं जातं. व्यवसायवाढीसाठी ब्लॉगिंग आणि सोशल मीडियाचा कसा वापर करू शकतात हे ग्राहकांच्या निदर्शनाला आणता येतं. थेट ब्लॉगिंगची ॲप्लिकेशन्स वापरून कुठेही बसल्या बसल्या मी ब्लॉगवर लिहू शकते. तेवढ्यासाठीच मी मराठी कीबोर्ड असलेले मल्टिलिंग हे ॲप इन्स्टॉल करून घेतलं आहे. अगदी हा लेखसुद्धा मी स्मार्टफोनवरच टाइप केलाय. रोजच्या खर्चाचा ताळमेळ ठेवण्यासाठी एक्स्पेन्स मॅनेजर सारखं ॲप मी वापरते. दिवसातल्या अनेक नोंदी लिहिण्याकरिता जी–नोट्स सारखं ॲप तर तारीखवार घटना लक्षात ठेवण्याकरिता कॅलेंडर ॲप वापरते.

**– श्रेया रत्नपारखी**

### अ‍ॅप्सची धमाल



माझ्या स्मार्टफोनचा मी अनेक प्रकारांत वापर करून घेत असते. नवनवीन ॲप्स शोधून काही नवीन शोधण्याची हौस मला आहे. स्मार्टफोनचा वापर रस्ते शोधायला, गाणी ऐकायला, वेगवेगळ्या देशाच्या वेळा आणि हवामान बघायला, ऑनलाइन शॉपिंग करायला मी माझ्या फोनचा वापर करते. अनेकदा रेल्वे, बस, सिनेमाची तिकीटं या गोष्टींची माहिती मिळवायला, रिझर्वेशन्स करायला मी फोनच वापरते. महिलांसाठी असलेली सेफ्टी ॲप्सही मी वापरते. व्हॉट्स ॲपमुळे शाळेतले वा जुने मित्र–मैत्रिणी एका क्लिकवर मला मिळाले. या सर्व गोष्टींची माहिती मिळवायला आणि परदेशातील माझ्या नातेवाईकांशी संपर्क साधण्यासाठी हा स्मार्टफोनच माझ्या कामी येतो. यामुळेच मला कॉलेजच्या नोट्सही एका क्लिकवर मिळतात. शिवाय व्हॉटसॲपच्या माध्यमातून एखाद्या महत्त्वाच्या गोष्टीचा फोटो क्षणात दुसऱ्या व्यक्तीकडे पाठवता येतो.

**– प्राजक्ता जगताप**

### नोट्ससाठी उपयोगी



कॉलेजमध्ये बसून सगळ्या नोट्स काढणं शक्य होत नाही. मग ते काम माझा स्मार्टफोन करतो. माझ्या फोनचा कॅमेरा खूप चांगला आहे. त्यामुळे नोट्सचे झेरॉक्स न काढता फोटो काढते. मग घरी बसून नोट्स पूर्ण करते. त्यामुळे झेरॉक्सचे पैसेही वाचतात. क्विक ऑफिससारख्या ॲपमधून पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन्स बनवता येतात. शिवाय मी सगळ्यात जास्त वापर करते तो फोन डिक्शनरीचा. यामुळे अडलेले शब्द शोधता येतात. एकूणच माझा फोन मला अभ्यासात खूप मदत करतो.

**– धनश्री खणकर**

### माहितीचा खजिना

मी रोजची वर्तमानपत्रं फोनवरच वाचते. ई–मेल्स चेक करणे आणि पाठवणे यासाठी मी फोनचा उपयोग करते. माझ्या फोनवर मी बँकेचं ॲपही डाऊनलोड केलंय. त्यावरून बँकेचे व्यवहारही पटापट होतात. लाइट आणि फोनची बिलं तसंच टिव्हीचं रिचार्जसुद्धा मी फोनवरूनच करते. ई–बँकिंग आणि मोबाईल बँकिंगसाठी फोनचा वापर करते. स्मार्टफोन आल्यापासून मी कम्प्युटरचा वापर कमी केला आहे. स्मार्टफोनवरच मी ई–बुक्स वाचते. जुनी गाणी ऐकते. ऐतिहासिक, पौराणिक माहिती वाचते. न्यूज चॅनेलच्या ॲपवरून ताज्या बातम्या मिळवते. गुगलवरून अनेक विषयांची माहिती मिळवते. विविध ॲप्स वापरून माझी कामं सोपी कशी होतील ते पाहते. **– तन्वी घरत**

## शॉर्ट न्यूज

### ग्रामपंचायत सदस्याचे बंदुकीचा धाक दाखवून अपहरण

■ **श्रीगोंदा :** तालुक्यातील आढळगाव येथील ग्रामपंचायतीच्या सरपंच उपसरपंच अविश्वास ठरावात सामील असलेल्या सदस्याचे कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे दोन चारचाकी गाडीतून आलेल्या पाच ते सहा जणांपैकी दोघांनी बंदुकीचा धाक दाखवून अपहरण केल्याची घटना घडली. नितीन बन्सी गव्हाणे असे अपहरण झालेल्या ग्रामपंचायत सदस्याचे नाव असून या प्रकरणी मिरजगाव पोलिस ठाण्यात दिपक राऊत यांच्या फिर्यादीवरून आढळगावचे सरपंच शिवप्रसाद उबाळे यांच्यासह इतर ६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास मिरजगाव पोलिस करत आहेत.

### श्रीरामपूर शहरात मोबाइल चोरीचे प्रकार वाढले

■ **श्रीरामपूर :** शहराच्या विविध भागांमध्ये भल्या पहाटे व सकाळी खिडकीमध्ये हात घालून मोबाइल चोरून नेण्याचे प्रकार वाढले आहेत. घराच्या दरवाजातूनही मोबाइल पळविले जात आहेत. त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. पोलिसांनी वेळीच या मोबाइल चोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी जनतेतून होत आहे. गुलशन चौकातील रेहान रज्जाक पठाण या तरुणाचा मोबाइल खिडकीत ठेवलेला असताना चोरून नेला. गेल्या महिन्यात या भागातून मोठ्या प्रमाणात मोबाइल चोरीच्या घटना घडल्या आहेत.

### नांदूरशिकारी येथील भाजपा कार्यकर्त्यांचा गडाख गटात प्रवेश

■ **नेवासा :** तालुक्यातील नांदूर शिकारी येथील भाजप कार्यकर्त्यांनी आ. शंकरराव गडाख यांच्या गटात प्रवेश केला आहे. नांदूर शिकारी येथे आ. शंकरराव गडाख यांच्या उपस्थितीत आबासाहेब खलाटे, विठ्ठल खलाटे, भास्कर खलाटे, सुनील खलाटे, आजिनाथ खलाटे, बबन खलाटे, मोहन खलाटे, मिश्रू खलाटे, छबुराव खलाटे, सतीश कासारे, अशोक कासारे, अशोक खलाटे, मिनीनाथ खलाटे, ज्ञानेश्वर खलाटे, रमेश खलाटे, संतोष खलाटे, अच्युत आठरे या भाजप कार्यकर्त्यांनी गडाख गटात प्रवेश केला आहे. यावेळी नांदूर शिकारी येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

### पर्जन्यमापक यंत्र बसवण्याची मागणी

■ **कोपरगाव :** तालुक्यात होणाऱ्या पर्जन्यमानाचे अचूक मोजमाप व्हावे यासाठी कोपरगाव तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये ग्रामपंचायतीच्या हद्दीत पर्जन्यमापक यंत्र बसवावे अशी मागणी कोपरगाव तालुका शेतकरी कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. त्याबाबतचे निवेदन समितीच्या वतीने कोपरगाव तालुक्याचे तहसीलदार संदीप कुमार भोसले यांना देण्यात आले. या वेळी कोपरगाव तालुका शेतकरी कृती समितीचे सदस्य पद्मकांत शंकरराव कुदळे, सदाशिव उर्फ बाबा रासकर, सदाशिव उर्फ बाबा रासकर, राजेंद्र खिल्लारी आदी उपस्थित होते.

### ३१ वर्षांनी वर्गमित्र रमले जुन्या आठवणीत

■ **पारनेर :** मोराची चिंचोली येथे निसर्ग रम्य वातावरणात पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील जनसेवा विद्यालयामधील सन १९९३ मधील इयत्ता दहावीच्या बॅचचा स्नेहमेळावा पार पडला. तब्बल ३१ वर्षांनी इयत्ता दहावीतील वर्गमित्र जुन्या आठवणीत रमल तब्बल ३१ वर्षानंतर शाळा भरल्याने माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी ६८ माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्यासाठी उपस्थित होते. स्नेह मेळाव्यासाठी प्रा. डॉ. शांताराम चौधरी व सर्वच माजी विद्यार्थी, विद्यार्थिनींनी या स्नेह मेळाव्यासाठी पुढाकार घेतला.

# भटके विमुक्त समाज घटकांना महिनाभरात दाखले देण्याचे मंत्री विखे यांचे निर्देश

## विधानभवनातील कार्यालयात विशेष बैठक संपन्न



**मुंबई : प्रतिनिधी**

**भटक्या विमुक्त समाजातील नागरिकांना महिना भरात दाखले वाटप करा त्यासाठी विशेष शिबिरांचे सर्व जिल्ह्यात आयोजन करण्याचे आदेश महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. त्याच बरोबर कागदपत्रांची कोणतीही जाचक अट न ठेवता कोणत्याही एका पुराव्यावर त्यांना दाखले देण्यात यावे असेही त्यांनी बैठकीत सांगितले.**

भटके विमुक्त यांना विविध दाखले मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील कार्यालयात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीला सदर बैठकीला इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे,महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव  राजेशकुमार,महाआयटी विभागाच्या  मुख्य व्यवस्थापक श्रीमती जयश्री भोज, त्याचबरोबर भटके विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष डॉ. संजय पुरी आणि इतर पदाधिकारी यांच्यासह दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी उपस्थित होते.

यावेळी महसूल मंत्री यांनी भटक्या विमुक्त विकास परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या विविध मागण्या आणि दाखले मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणी समजून घेतल्या.आधार कार्ड, शिधा पत्रिका, आयुष्यमान कार्ड, जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र असे विविध दाखले देण्यासाठी भटक्या विमुक्त विकास परिषेदेच्या संयोजकांबरोबर तालुका स्तरावर तहसीलदार, ग्रामसेवक यांनी काम करावे आणि प्राधान्याने महिनाभरात जास्तीत जास्त शिबिरे राबवून त्यांना दाखल्यांचे वाटप करावे असे मंत्री महोदय म्हणाले. आणि सर्व विभागीय आयुक्तांनी दर आठवड्याला या संदर्भात बैठक घेऊन आढावा घेऊन आलेल्या अडचणी सोडवाव्यात आणि ३० ऑगस्ट पर्यंत ही मोहीम पूर्ण करावी असे सांगितले.

त्यामुळे आता भटके विमुक्त समाजातील नागरिकांना मतदान कार्ड, सामाजिक न्याय विभागाच्या जिल्हा समाज कल्याण अधिकारी किंवा अधिकृत केलेल्या राजपत्रित अधिकाऱ्याचा भटके विमुक्त समाजाचा असल्याचा दाखला, शहरी भागात नगरसेवकांचा व ग्रामीण भागात सरपंच/उपसरपंच यांचा रहिवाशी दाखला यापैकी कोणतेही एक कादगपत्र असल्यास आवश्यक असलेले दाखले मिळणार आहेत.

सदर मोहिमेतून भटके विमुक्त यांना विविध दाखले मिळवताना येणाऱ्या अडचणी संपुष्टात येतील आणि त्यांना मोठा दिसला मिळेल असा विश्वास मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला.

## वाचकांच्या लेखणीतून

### देर से सही; दुरुस्त तो है!

खा. लंकेंच्या पुढाकारातून सारोळा अडवाईला बस सेवा ही आनंददायी बातमी वाचली (पारनेर दर्शन, १२ जुलै, शुक्रवार).
१जून २०२४ रोजी एस.टी.ने ७६ व्या वर्षात पदार्पण केले आहे. प्रवाशांच्या सेवेसाठी हे व्रत घेतलेल्या लाल परीने इतक्या दीर्घ कालावधीने सारोळा अडवाईकरांवर कृपादृष्टी टाकली, हे खरे तर नवलच म्हणावे लागेल.



सारोळा अडवाईचे सरपंच दत्तात्रेय शिंदे, उपसरपंच कुंदा आबूज , एस.टी.विभाग नियंत्रक मनीषा सकपाळ, पारनेर आगारप्रमुख कार्यालय आणि आपले विद्यमान खासदार निलेश लंके यांच्या प्रामाणिक प्रयत्नांतून पारनेर-सारोळा अडवाई एस.टी. बससेवा सुरू झाली. ही सारोळा अडवाईकरांसाठी नक्कीच आनंददायी बातमी आहे. दररोज साधारणपणे ८० महाविद्यालयीन मुलांमुलींना खाजगी वाहनांनी  मूळ गाव ते पारनेर आणि पारनेर ते मूळ गाव असा खाजगी आणि महागडा प्रवास करावा लागे. नुसते विद्यार्थीच नव्हेत; तर इतर ग्रामस्थांचीही  ससेहोलपट होत असणार!
आता या गावाला एस.टी.बस सुरू झाल्याने गोरगरीब ग्रामस्थ आणि महाविद्यालयीन मुलांमुलींनी सुटकेचा नि:श्वास सोडला असणार!
माननीय खासदार निलेश लंके यांच्या नेक आणि यशस्वी प्रयत्नांबद्दल सारोळा अडवाईचे सरपंच तथा उपसरपंच यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे, ती उचितच आहे.
एस.टी. एकदाची सारोळा अडवाई गावात पोहचली आहे. देर से सही; दुरुस्त तो है!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# चंदनापुरी घाटात ५००० झाडांचे वृक्षारोपण

## रस्त्यांच्या दुतर्फा रंगीबेरंगी फुलझाडांचे रोपण होणार



**संगमनेर : प्रतिनिधी**

**ग्लोबल वार्मिंगच्या समस्येवर मात करण्यासाठी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या दंडकारण्य अभियान अंतर्गत थोरात कारखान्याच्या वतीने चंदनापुरी घाटात ५००० विविध झाडांचे आज रोपण करण्यात आले. तर गावागावांसह तालुक्यातील तीन घाटात व अकरा डोंगरांवर विविध सहकारी संस्थांच्या वतीने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व संगोपन करण्यात येत असल्याची माहिती प्रकल्प प्रमुख दुर्गा तांबे यांनी दिली आहे. चंदनापुरी घाटात सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने १९ व्या दंडकारण्य अभियानांतर्गत विविध ५००० झाडांचे रोपण करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या.**

यावेळी बोलताना तांबे म्हणाल्या,आमदार बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली दंडकारण्य अभियानाचे हे एकोणिसावे वर्ष आहे. या अंतर्गत तालुक्यातील प्रत्येक गावागावात मोकळ्या जागेत वृक्षारोपण सुरू आहे. या वृक्षांच्या संगोपनाची जबाबदारी त्या स्थानिकांवर देण्यात आली आहे. तर तालुक्यातील शिखर संस्थांच्या वतीने तालुक्यातील विविध अकरा डोंगरांवरती वृक्षारोपण केले जात असून संवर्धन व संगोपन केले जात आहे. तसेच आमदार बाळासाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी घाट , कऱ्हे घाट, कोची घाट या घाटांमध्ये वृक्षारोपणासह दरवर्षी रस्त्यांच्या दुतर्फा रंगीबेरंगी फुलांचे रोपण करण्यात येते. त्यामुळे पावसाळ्यात आणि हिवाळ्यात हा परिसर अत्यंत सुंदर दिसतो.

यावर्षीही या घाटांमधील रस्त्यांच्या दुतर्फा विविध रंगीबेरंगी फुलांचे रोपण करण्यात येणार आहे. तर बाबा ओहोळ म्हणाले, पर्यावरण संवर्धनाचे दंडकारण्य अभियान ही संगमनेर तालुक्याची लोक चळवळ आहे. वृक्ष संवर्धन संस्कृती वाढली असून गावा गावच्या शिवारांमधून हिरवी झाडे दिसू लागली आहेत. प्रत्येकाने दरवर्षी किमान दोन झाडे लावून त्याचे संवर्धन केले पाहिजे, असेही ते म्हणाले.

# विधानसभेच्या निवडणुकीत मविआ २२५ जागा जिंकणार

## शरद पवारांचा दावा



**मुंबई : प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील राजकारण बदलण्याची अपेक्षा आहे. उद्योजक, व्यापारी असेल कोणताही घटक असेल, देशात एक शक्तिशाली महाराष्ट्र राज्य निर्माण करूया, असे आवाहन करत, विधानसभेच्या २८८ जागा आहेत. त्यापैकी २२५ जागा आपल्या निवडून येतील, असा मोठे भाकित शरद पवार यांनी केले.**

लोकसभा निवडणुकीनंतर राज्यातील समीकरणे बदलताना दिसत असल्याची चर्चा आहे. माजी आमदार सुधाकर भालेराव यांनी भाजपाच्या सदस्यत्वासह सर्वच पदांचा राजीनामा देत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात शरद पवार यांच्या उपस्थितीत सुधाकर भालेराव यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

यावेळी ते बोलताना म्हणाले,''निवडणुका झाल्यावर राष्ट्रवादीत सहभागी होण्यासाठी कार्यकर्ते येत आहेत. चित्र बदलायचे असेल, तर राष्ट्रवादीला ताकद देण्यासाठी कार्यकर्ते येतात, ही चांगली गोष्ट आहे. जबरदस्त शक्ती आपण उभी करायला सुरुवात केली आहे. उदगीर आणि देवळालीतील कार्यकर्ते येत आहेत. गेल्या वेळी राष्ट्रवादीचा उमेदवार निवडून दिला. मात्र, या दोन्ही मतदारसंघातील उमेदवाराने मतदारांचा घात केला. मतदारांनी मते दिली, विधानसभेत पाठवले, त्यांची साथ सोडली आणि वेगळी भूमिका घेतली. पण, लोकांना काही गोष्टी आवडत नाहीत, असे सूतोवाच करत त्यांना योग्य प्रकारचा धडा शिकवण्ची गरज आहे,'' असे शरद पवार म्हणाले.

# अखेर अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर!

## तीन न्यायाधीशांचं खंडपीठ याचिकेवर सुनावणी करणार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना यांना सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला आहे. त्यांच्या अटकेला आव्हान देणाऱ्या त्यांच्या याचिकेवर आज (ता.१२) सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. दारू घोटाळ्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाकडून अंतरिम जामीन दिलासा मिळाला आहे. पण त्यांच्या अटकेचे प्रकरण ईडी ने सर्वोच्च न्यायालयाच्या मोठ्या खंडपीठाकडे सोपवले आहे.**

सर्वोच्च न्यायालयाचे तीन न्यायाधीशांचे खंडपीठ केजरीवाल यांच्या याचिकेवर सुनावणी करणार आहे. या प्रकरणात सरन्यायाधीश तीन न्यायाधीशांची नियुक्ती करतील. या प्रकरणाची मोठ्या खंडपीठासमोर सुनावणी होईपर्यंत केजरीवाल यांना अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला आहे. मात्र, केजरीवाल सध्या तुरुंगातून बाहेर पडू शकणार नाहीत. ते सध्या सीबीआयच्या कोठडीत आहेत, पण त्यांना ईडी प्रकरणात जामीन मिळाला आहे. अशा परिस्थितीत तो सध्या तुरुंगातच राहणार आहे.
अरविंद केजरीवाल यांचे वकील विवेक जैन यांनी सांगितले की, सीबीआय प्रकरणी १८ जुलै रोजी दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी आहे. या प्रकरणातील निर्णयानंतरच केजरीवाल बाहेर पडतील की नाही हे कळेल. मात्र, केजरीवाल तुरुंगातून बाहेर येण्याची प्रबळ शक्यता आहे.
मुख्यमंत्री केजरीवाल यांना ईडीने २१ मार्च रोजी मनी लॉड्रिंग प्रकरणात अटक केली होती. एक लाख रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर त्यांना कनिष्ठ न्यायालयाने २०जून रोजी जामीन मंजूर केला होता. मात्र, दुसऱ्याच दिवशी ईडीने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. केजरीवाल यांना जामीन देण्याचा कनिष्ठ न्यायालयाचा आदेश एकतर्फी आणि चुकीचा असल्याचा युक्तिवाद ईडीने केला होता.






# पंधरा दिवसांत मागण्या मार्गी लावण्याचे मनसेला आश्वासन

## मनसेच्या ठिय्या आंदोलनाची महसूल प्रशासनाकडून दखल



पारनेर, सुपा : प्रतिनिधी

**महसूल विभागाच्या पुरवठा विभागाकडे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले रेशनकार्ड तसेच सेतू सुविधा केंद्रामधून विद्यार्थ्यांसह पालकांची लुट थांबविण्यात यावी आदी मागण्यांसाठी मनेसच्या वतीने करण्यात आलेल्या ठिय्या आंदोलनाची दखल घेत येत्या पंधरा दिवसांत मागण्या मार्गी लावण्याची ग्वाही महसूल प्रशासनाकडून देण्यात आली.**

मनसेच्या वतीने आंदोलन सुरू करण्यात आल्यानंतर पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी मध्यस्थी करीत १५ दिवसात प्रकरणे निकाली काढण्याची ग्वाही नायब तहसिलदार गणेश आढारी यांच्या वतीने देण्यात आली. दरम्यान पंधरा दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा अविनाश पवार यांनी दिला.

भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, तालुका दुध संघाचे तालुकाध्यक्ष दत्ता नाना पवार, मनसेचे नितिन म्हस्के, कडूस ग्रामपंचायतीचे सदस्य नारायण नरवडे, अक्षय सुर्यवंशी, बबन गुंड, कडूसचे सरपंच मनोज मुंगसे, सतिश पिंपरकर, फिरोज शेख यांच्यासह मनसे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

### तर पुन्हा संघर्षाची तयारी

**आंदोलनानंतर पुरवठा विभाग रात्री उशिरापर्यंत सुरू होता. सुमारे सातशे प्रकरणे एकाच दिवसांत निकाली काढण्यात आली. येत्या १५ दिवसांत प्रलंबित प्रकरण मार्गी लावण्याचे अश्वासन तहसिलदार गायत्री सैंदाणे नायब तहसिलदार गणेश आढारी यांनी दिले आहे. पंधरा दिवसांत प्रश्न मार्गी न लागल्यास पुन्हा संघर्ष करण्यात येईल.**

**अविनाश पवार**
मनसे नेते

### नागरिकांमध्ये समाधान

**पुरवठा विभागाकडे प्रलंबित असलेल्या रेशनकार्ड संदर्भात नागरिकांना हेलपाटे मारावे लागत होते. रेशनकार्डसाठी पैशांचीही मागणी करण्यात येत होती. एजंटमार्फत पैसे दिले तरच रेशनकार्ड देण्यात येत असल्याने गुरूवारी मनसेच्या वतीने मनसे स्टाईल आंदोलन छेडताच पुरवठा विभाग सुतासारखा सरळ झाला. काही अंशी हा प्रश्न सुटल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.**

# नगरसेवक चेडे यांनी वेधले विविध समस्यांकडे लक्ष

## उपाययोजना न झाल्यास आंदोलनाचा इशारा

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर नगरपंचायत हद्दीतील विविध समस्यांकडे भाजपाचे नगरसेवक अशोक चेडे यांनी मुख्याधिकारी विनय शिपाई यांना निवेदन सादर करून लक्ष वेधले. विविध मागण्यांचे येत्या आठ दिवसांत निराकारण न झाल्यास नगरपंचायत कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा चेडे यांनी या निवेदनात दिला आहे.**



■ पारनेर नगरपंचायत हद्दीतील विविध समस्यांकडे नगरसेवक अशोक चेडे यांनी मुख्याधिकारी विनय शिपाई यांना निवेदन सादर करून लक्ष वेधले. यावेळी नगराध्यक्ष नितिन अडसूळ हे उपस्थित होते.

चेडे यांनी मुख्याधिकारी शिपाई यांना निवेदन सादर केले त्याप्रसंगी नगराध्यक्ष नितिन अडसूळ हे देखील उपस्थित होते. निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, पारनेर शहराच्या विविध भागामध्ये मोठया प्रमाणावर कचरा साचला असून त्याची दुर्गंधी पसरली आहे. पावसाळयाच्या पार्श्वभुमीवर साचलेल्या कचऱ्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होण्याची भिती आहे. मोठया प्रमाणात गवत वाढल्याने शहरात डासांचे प्रमाण वाढले असून त्यामुळे डेंग्युची साथ फैलावत असल्याचे चेडे यांनी निवेदनात नमुद केले आहे.

विविध रस्त्यांवर पडलेल्या खड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून हे खडडे त्वरीत बुजविण्यात यावेत. शहरातील काही वाडया वस्त्यांवर दिवसभार पथदिवे सुरू असतात तर दुसरीकडे काही वाडया वस्त्यांवरील पथदिवे अनेक दिवसांपासून बंद आहेत. बंद पथदिवे त्वरीत सुरू करण्यात यावेत.

पारनेर बसस्थानकाजवळ गटार खोदून पाच ते सहा महिने उलटले असून तिथे ड्रेनेज लाईन टाकणे गरजेचे असताना नगरपंचायत प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष होत आहे. ही ड्रेनेज लाईन त्वरीत टाकण्याची मागणी चेडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

विविध मागण्यांची गंभीर दखल घेऊन तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात. मागण्यांची दखल न घेतली गेल्यास नगरपंचायत कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा चेडे यांनी या निवेदनात दिला आहे.

# पोस्ट विभागामार्फत राबवलेल्या बँक खाते कॅम्पला उत्स्फुर्त प्रतिसाद

## माझी लाडकी बहीण योजनेसाठी चोंभूत येथे महिलांनी उघडली खाती



चोंभूत : प्रतिनिधी

**राज्य सरकारने नुकतीच घोषित केलेली माझी लाडकी बहीण योजनेसाठी प्रत्येक पात्र महिलांकारिता स्वतःचे स्वतंत्र बँक खाते असणे आवश्यक आहे. यासाठी राष्ट्रीयकृत बँकेत जाऊन अल्पावधीत खाते खोलणे शक्य नाही. याच गोष्टीचा विचार करून गावातील काही युवा कार्यकर्ते यांनी इंडियन पोस्ट विभागाचा स्वतंत्र कॅम्प दि.९ जुलै रोजी चोंभूत येथे** आयोजित करण्यात आला होता.

सदर कॅम्प मध्ये एका दिवसात तब्बल १८० महिलांची खाती एकच दिवसात खोलण्यात आली. या कॅम्पसाठी पोस्ट मास्तर प्रांजल आंबेडकर तसेच निता म्हस्के यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कॅम्प यशस्वी करण्यासाठी बबन कोल्हे , रावसाहेब माळी , दत्ता कोल्हे, श्रीकांत माळी, प्रणल भालेराव, दत्ता शेळके, दिपक शिंदे, लोकेश माळी आदींचे मोलाचे सहकार्य लभाळे रावसाहेब माळी , दत्ता कोल्हे, श्रीकांत माळी, प्रणल भालेराव, दत्ता शेठ शेळके , दिपक शिंदे, लोकेश माळी आदींचे सहकार्य लाभले.

**चोंभूत गावातील जास्तीत जास्त महिलांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यावा.या करता गावातील तरुण मंडळी प्रयत्नशील असतील.कोणत्याही महिला लाभार्थ्यास अडचण येत असेल तर ती सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करू.**

**–नितीन संपत घोलप**
(युवा कार्यकर्ते चोंभूत)

# माही सुर्यवंशी आरपीआय आंबेडकर गटाच्या तालुकाध्यक्ष ; आरती सोनवणे उपाध्यक्षपदी



पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर गटाच्या महिला तालुकाध्यक्षपदी माही सुर्यवंशी तर उपाध्यक्षपदी आरती रमेश सोनवणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.**

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक निकाळजे, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनिता चव्हाण, कार्याध्यक्ष बाळासाहेब पवार, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष शशी दरोळे, जिल्हा संपर्क प्रमुख रोहीत आव्हाड, बंडू आव्हाड यांच्या आदेशाने पारनेर तालुका नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या.

महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांबरोबरच तालुका कार्याध्यक्षपदी सचिन अल्हाट तर पारनेर शहराध्यक्षपदी सीमा प्रधान यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना जिल्हाध्यक्ष प्रदिप मकासरे यांच्या हस्ते नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली.

पारनेर शहरातील तक्षशिला बुध्दविहार येथे पक्षाची तालुकास्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत पक्षाचा वर्धापनदिन व तसेच राष्ट्रीय अध्यक्ष दिपक निकाळजे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यासंदर्भात विचार विनिमय करण्यात आला.

या बैठकीस अहमदनगर जिल्हा संपर्कप्रमुख रोहीत आव्हाड, जिल्हाध्यक्ष प्रदिप मकासरे, उत्तर अहमदनगर युवक अध्यक्ष रॉकी लोंढे, अहमदनगर शहराध्यक्ष हरीश अल्हाट, पारनेर तालुकाध्यक्ष किरण सोनवणे, युवक तालुकाध्यक्ष प्रदीप मोरे, शहराध्यक्ष निखिल गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. बैठक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी ॲड. मोनिका सोनवणे, मृणाली सुर्यवंशी, प्रतीक्षा मोरे, अनिता रोकडे, लता सुर्यवंशी, गणेश सोनवणे, अक्षय जाधव, सुनील चौधरी, स्मितम राक्षे, रमेश सोनवणे, राजेंद्र जेकटे, दीपराज सोनवणे, यशवंत रोकडे आदींनी परिश्रम घेतले.

# बँक्स असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी व्यवहारे बिनविरोध

## कोपरगांवचे सत्येन मुंदडा अध्यक्ष

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकेचे चेअरमन शिवाजीराव व्यवहारे यांची अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. कोपरगांवच्या कोपरगांव पिपल्स को-ऑप बँकेचे चेअरमन सत्येन मुंदडा यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली.**

सहकार अधिकारी तथा अध्यासी अधिकारी बी. बी .सिनारे यांच्या अध्यक्षतेखाली असोसिएशनच्या कार्यालयात असोसिएशनच्या संचालक मंडळाच्या पार पडलेल्या बैठकीत दोन्ही पदाधिकाऱ्यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. अध्यक्ष सत्येन मुंदडा व उपाध्यक्ष शिवाजी व्यवहारे यांच्या निवडीबद्दल सामाजिक, सांस्कृतिक, सहकार, शिक्षण, क्रीडा आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.



असोसिएशनचे उपाध्यक्ष शिवाजी व्यवहारे हे तिसऱ्यांदा पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकेचे चेअरमन म्हणून नेतृत्व करीत असून त्यांच्यासह त्यांच्या सहकारी संचालक मंडळाने बँकेच्या प्रगतीसाठी दिलेले योगदान सर्वश्रुत आहे. व्यवहारे यांनी चेअरमन म्हणून बँकेची सुत्रे हाती घेतल्यानंतर बँकेचा विस्कळीत झालेल्या कारभाराची घडी बसविण्याचे महत्वपुर्ण काम त्यांनी संचालक मंडळ तसेच कर्मचारी वर्गाच्या मदतीने केले. थकीत कर्जांच्या वसुलीबरोबरच ठेवींमध्ये वाढ करण्यातही त्यांनी योगदान दिलेले आहे. बँकेच्या कारभारात सुसुत्रता आणून सहकार क्षेत्रात आदर्श निर्माण करण्यासाठीही व्यवहारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी बहुमोल योगदान दिले आहे.

आजी माजी सैनिकांबरोबरच सामान्य ग्राहकांना विविध बँकींग सुविधा उपलब्ध करून देतानाच बँकेचा कारभार लोकाभिमुख करण्यात आल्याने तालुक्याच्या सहकार क्षेत्रात सैनिक बँकेने आपले वेगळेपण निर्माण केले आहे. अलिकडेच पार पडलेल्या बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीत सभासदांनी शिवाजी व्यवहारे व त्यांच्या सहका-यांच्या हाती बँकेची पुन्हा सुत्रे देत व्यवहारे व सहकाऱ्यांवर पुन्हा जबाबदारी सोपविली आहे.

# माऊली वरखडेंनी वाढदिवसनिमित्ताने जपली सामाजिक बांधिलकी

## ■ आदिवासी विद्यार्थ्यांना केले अन्नदान ■ वरखडे यांचे सर्वत्र कौतुक




निघोज : प्रतिनिधी

**निघोज गावचे कार्यक्षम उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊली वरखडे यांनी त्यांचा वाढदिवस अत्यंत साधेपणाने साजरा करीत पारनेर तालुक्यातील बाभुळवाडा येथील जाईबाई येवले आदीवासी आश्रम शाळेतील आदिवासी शेकडो विद्यार्थ्यांना गोड जेवण देत अन्नदान केले.**

वरखडे यांचा वाढदिवस त्यांचे समर्थक कार्यकर्ते व मित्र मंडळ हे प्रत्येक वर्षी मोठ्या उत्साहात साजरा करीत क्रिकेट स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून साजरा करीत असतात मात्र या वर्षी उपसरपंच वरखडे यांनी वाढदिवस अत्यंत साधेपणाने कोणताही डामडौल न करता साजरा करणार असल्याची सुचना कार्यकर्ते व मित्र परिवार यांना दिली होती.

त्यानुसार त्यांनी बाभुळवाडा येथे जाऊन संबंधित प्राचार्य, मुख्याध्यापक व संस्था अध्यक्ष व पदाधिकारी व विश्वस्त मंडळ यांच्याशी चर्चा केली तसेच येथील आदिवासी शेकडो विद्यार्थ्यांना गोड जेवण दिले. यावेळी वरखडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी या आदिवासी विद्यार्थ्यांबरोबर पाच तास वेळ देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच शैक्षणिक दृष्ट्या त्यांना कोणते सहकार्य करता येईल याची माहिती घेतली तसेच वरखडे यांच्या मित्र परिवारातील वाढदिवशी हे शैक्षणिक साहित्य देण्याचे त्यांनी ग्वाही दिली.

यावेळी जाईबाई येवले आदिवासी आश्रम शाळेचे प्राचार्य,मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या हस्ते उपसरपंच वरखडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रसिद्ध ठेकेदार विलास हारदे, विकास लंके, रवि लंके, गुलाब काळे, मोहन तनपुरे, प्रविण शेळके, गणेश लाळगे, कैलास कवाद, प्रमोद गुंजाळ, अक्षय वरखडे, मयुर लंके, माऊली श्रीमंदिलकर, रवि लामखडे, वैभव वरखडे, सोपान लामखडे, संकेत वरखडे, सुशांत वरखडे आदी उपस्थित होते.

# शिवसेनेचे तालुकाप्रमुख पंढरीच्या वारीत रुग्णसेवेत दंग !

## डॉ.श्रीकांत पठारे व सहकाऱ्यांची दिंड्यांमध्ये रुग्णसेवा

पारनेर : प्रतिनिधी

**दरवर्षीप्रमाणे आषाढी वारीत पंढरपुरला जाणाऱ्या पारनेर तालुक्यातील विविध गावातील वैष्णवांच्या मेळ्यात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख मनोभावे आरोग्यसेवा करत आहेत. त्यांचे सहकारी संतोष साबळे, प्रशांत निंबाळकर, मोहित जाधव, ऋषी माने, अभिजीत घोलप, विराज पठारे हे त्यांना रुग्णसेवेत सहकार्य करत आहेत.**



तालुक्यातील पिंपळनेर, वडझिरे, बाभुळवाडे, पोखरी, देसवडे, पुणेवाडी, कान्हुर पठार, वडगाव दर्या, गुणोरे, निघोज, लोणीमावळा, सावरगाव, पठारवाडी, पानोली, सूपा परिसरातील शेकडो दिंड्या दरवर्षीप्रमाणे आषाढी वारीसाठी पंढरपुरला पांडुरंगाच्या दर्शनासाठी निघाल्या आहेत. या दिंड्यांना दरवर्षी डॉ.श्रीकांत पठारे आरोग्यसेवेच्या माध्यमातुन सेवा देत असतात, वैष्णवांच्या या मेळ्यात आरोग्यसेवा करणे हीच आमची दरवर्षीची पंढरीची वारी असते व या सेवेत आम्ही साक्षात पांडुरंगाचे दर्शन घेतो असे डॉ.श्रीकांत पठारे म्हणतात.

तालुक्यातील हजारो वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य पांडुरंगाने मला दिले यातच माझे जीवन धन्य आहे आणि जीवात जीव आहे तोपर्यंत ही सेवा आम्ही दरवर्षी देत राहू असेही डॉ.श्रीकांत पठारे म्हणाले.

तालुक्यातील सर्वच दिंड्यांना प्रस्थानापासून लागणारी आरोग्यसेवा व इतर मदत देण्याचे काम अनेक भक्त करत असतात आणि त्याच सेवेतून मिळणारा आनंद अवर्णनीय असतो तसेच ही सेवा म्हणजे अगदी अल्पशी असते परंतु देवाच्या भक्तांच्या या सेवेत मिळणारे सुख कशातच नाही अशी भावना आमच्या सहकाऱ्यांची असते असे डॉ.श्रीकांत पठारे हे सांगतात.

# डॉ.शिरोळे दांपत्याची वैद्यकीय सेवेची परंपरा यंदाही कायम

## वारकऱ्यांवर उपचार अन् मोफत औषधही

निघोज : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील अळकुटी येथील नित्यसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.भास्करराव शिरोळे व डॉ. स्मिता शिरोळे यांनी दि.१० व दि.११ रोजी दोन दिवस इंदापूर, अकलूज परिसरातील पारनेर तालुक्यातील साठ दिंडीमंडळांना भेटी देत वारकऱ्यांची वैद्यकीय सेवा करीत शेकडो वारकऱ्यांवर वैद्यकीय उपचार केले आहेत. तसेच हजारो रुपयांची मोफत औषधे देऊन सेवाभाव केला आहे.**



■ नित्यसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भास्करराव शिरोळे व डॉ स्मिता शिरोळे यांनी पायीवारीतील वारकऱ्यांवर वैद्यकीय सेवा माध्यमातून उपचार केले आहेत.

गेली अनेक वर्षांपासून नित्यसेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून डॉ. शिरोळे दांपत्य हा सेवाभाव करीत असून प्रत्येक वर्षी दोन दिवस पंढरीच्या पांडुरंगाच्या वाटेवर असणाऱ्या भावीकांची सुश्रुषा करीत हे डॉ. शिरोळे दांपत्य पुण्यकर्म करीत आहेत. नित्यसेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेली पंचवीस वर्षांपासून डॉ. भास्करराव शिरोळे यांनी सामाजिक कार्याला हातभार लावीत अनेक सेवाभावी उपक्रम केले आहे. प्रत्येकाच्या सुखदु:खात उपस्थित राहात डॉ. शिरोळे यांचा पारनेर तालुक्यात मोठा जनसंपर्क निर्माण केला आहे.

तालुक्यातील कोणताही धार्मिक कार्यक्रम असला तरी डॉ. शिरोळे हे उपस्थित राहून योगदान देतात हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. दिंडी मंडळांना भेटी देऊन त्यांनी त्यांचे सामाजिक कार्य पुढे नेण्याचे काम केल्याबद्दल त्यांचा रामदास महाराज दुसाणे दिंडी मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब महाराज कोल्हे व कानिफनाथ दिंडी मंडळाचे अध्यक्ष गोरक्ष ढवण यांनी डॉ. शिरोळे दांपत्य यांचा सत्कार केला आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com